www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ७४ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.७ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# सरकारच्या चहापानावर बहिष्कार ;महाविकास आघाडीची भूमिका

## सरकारच्या चहापान कार्यक्रमास उपस्थित राहणे,हा संकटात होरपळत असलेल्या शेतकऱ्याप्रती द्रोह ठरेल-वडेट्टीवार

**नागपूर :-राज्यावर दुष्काळ, पाणीटंचाई व अवकाळीचे संकट उभे ठाकले असून शेतकऱ्यांच्या डोळयात अश्रु आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांची झोप उडाली असताना सरकार मात्र सुस्त आहे. शेतकऱ्यांची ही दुर्देवी परिस्थिती असताना सरकारने चहापानाचा कार्यक्रम टाळायला हवा होत. हा कार्यक्रम टाळला असता तर शासन शेतकऱ्यांबरोबर असल्याचा दिलासा राज्यातील शेतकरी, शेतमजूर यांना मिळाला असता. दुर्देवाने सरकारने शेतकऱ्याप्रती ही संवेदनशीलता दाखवली नाही. पण संपूर्ण राज्यातील शेतकरी दुष्काळ, पाणीटंचाई व अवकाळीचे चटके भोगत असताना आम्ही चहापान कार्यक्रमास उपस्थित राहणे हा संकटात होरपळत असलेल्या शेतकऱ्याप्रती द्रोह ठरेल. त्यामुळे चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याची भूमीका महाविकास आघाडी सरकारने घेतली आहे. असे विधानसभेचे विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.**

नागपूर येथील रविभवन येथे अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत वडेट्टीवार बोलत होते. यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, आमदार बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जयंत पाटील, आमदार अनिल देशमुख, शिवसेनेचे आमदार सुनिल प्रभू, शेकापचे जयंत पाटील, आमदार राजेश राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.वडेट्टीवार म्हणाले की, राज्यावरील वाढलेले कर्ज, शेतकऱ्यांची दैन्यावस्था, शेती क्षेत्राची दुरावस्था, शासकीय रुग्णालयात मृत्यूतांडव, राज्यातील पाणीटंचाई परिस्थीती, स्मारकांची स्थिती, आरक्षणाबाबतची असंवेदनशीलता, अल्पसंख्यांकाबाबत नकारात्मक दृष्टीकोन, कंत्राटी भरती व बेरोजगारीमुळे युवकांमधील वाढता रोष, कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे, सरकारची प्रसिध्दीची हाव, स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक, अंतर्गत सत्ता स्पर्धेचे दुष्परीणाम, विदर्भातील कापूस, धान उत्पादक शेतकऱ्यांवरील संकट, अशा अनेक समस्या असताना सरकार चहापान कार्यक्रम करत आहे. यावरून सरकारचा संवेदनशिलपणा हरविल्याचे दिसून येते.छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्राची ओळख दंगलग्रस्त महाराष्ट्र अशी ओळख या महायुती सरकारने केली. पुरोगामी महाराष्ट्रात सर्वात जास्त दंगली झाल्या. महाराष्ट्रात २०२२ मध्ये दंगलीच्या तब्बल ८ हजार २१८ प्रकरणांची नोंद झाली आहे. ही त्या वर्षातल्या देशातील सर्वाधिक नोंद असल्याची केंद्रीय गृहमंत्रालयाच्या माहिती आहे. महायुती सरकार आल्यावर राज्यात दंगली, बलात्काराच्या घटनेत वाढ झाली. संत्रा नगरी असलेल्या नागपूरची ओळख आता चोरांची राजधानी अशी झाली आहे. जर महाराष्ट्राची ही ओळख होत असेल तर या राज्यात गुंतवणूक कशी येणार? उद्योग कसे येणार? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला. वडेट्टीवार म्हणाले, महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या झाल्याची माहिती एनसीआरबीच्या अहवालात समोर आली आहे. गरीबी, बेरोजगारीमुळे जगणं असह्य झाल्याने अनेकांनी आत्महत्या केल्याचं अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्रात एका वर्षात २२,७४६ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. कर्जबाजारीपणाच्या विळख्यात अडकून आणि दिवाळखोरीमुळे आत्महत्या करणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. शेती क्षेत्रात दर तासाला एकापेक्षा जास्त शेतकरी आणि शेतमजूर आत्महत्या करतात. याला म्हणतात दिव्याखाली अंधार.



NCRB आकडेवारी नुसार २०२२ वर्षात राज्यात सगळ्यात जास्त नागपूर मध्ये २ हजार ५०३ चोरीच्या घटना झाल्या आहेत. महायुती सरकार आल्यावर महाराष्ट्र राज्याच्या प्रतिमेला काळीमा फासला आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोचा अहवालानुसा महाराष्ट्र खुनाच्या घटनेत तिसरा, बलात्कारात चौथ्या क्रमांकावर, सायबर गुन्ह्यांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. मराठवाड्यात बीडमध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या. सर्वाधिक दुष्काळ. तरीही शासन आपल्या दारी कार्यक्रमात प्रचंड उधळपट्टी. ही उधळपट्टी म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर तिखट-मीठच सरकारने चोळले. उधळपट्टी ऐवजी शेतकऱ्यांना सरकारने मदत करावी, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.वडेट्टीवार म्हणाले, राज्यातील प्रत्येक माणसाच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा वाढला असुन सरकारच्या उधळपट्टीमुळे राज्याची आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे. शासनाचे आरोग्य व्यवस्थेकडे होणारे दुर्लक्ष हे महाराष्ट्र सारख्या प्रगत राज्याला भूषणावह नाही हे खेदाने म्हणावे लागते. महाराष्ट्र हे फुले, शाहु, आंबेडकरांच्या पुरोगामी विचाराचा वारसा जपणारे राज्य असून या सरकारने मात्र जाती जाती मध्ये संघर्ष निर्माण करण्याचे काम सुरु केले आहे. मराठा व ओबीसींच्या राजकीय आरक्षणाबाबत बोटचेपेपणाची भूमिका घेतल्याचे दिसते. त्यामुळे मराठा व ओबीसी समाजामध्ये सरकार बद्दल प्रचंड रोष आहे. जनतेचे प्रश्न सरकारला सोडवता न आल्याने सरकारी तिजोरीतून आपली पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न शासन आपल्या दारी या योजनेद्वारे सुरु आहे. यामध्ये राज्य सरकार जनतेची कामे न करता जाहिरातबाजीवर भर देत आहे. शासन आपल्या दारी योजनेचा फोलपणा दिसून येत आहे. आपल्या सरकारची कामगिरी खोटी असून प्रसिध्दी मात्र मोठी आहे. राज्य सरकारमधील अंतर्गत मतभेद, मंत्र्याची विसंगत विधाने, एकमेकांवर होणारी कुरघोडी, अंतर्गत सत्तास्पर्धा व हेवेदाव्यांमुळे प्रशासनाचे तीन तेरा वाजले आहेत. एकंदरीतच फुले, शाहु, आंबेडकरांच्या विचारांना काळिमा फासण्याचे काम आपल्या सरकार मार्फत केले जात आहे. चोर-चोर भाऊ-भाऊ सरकारची तिजोरी लुटून खाऊ, अशी या सरकारची अवस्था असल्याचा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी केला आहे

# आ.रामदास आंबटकर यांच्या शुभहस्ते भुमीपुजन




**पुलगाव । प्रतिनिधी**

दिनांक ६ डिसेंबर बुधवार ला पुलगाव जिल्हा वर्धा येथील प्रभाग क्रमांक ०४ मधील तहसील कार्यालय जवळ राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकाचे सौंदर्यीकरणाकरिता भूमिपूजन समारंभ आ. रामदास आंबटकर विधान परिषद सदस्य यांच्या विकास निधीतून आणि शुभ हस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते ,भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य राजीव बत्रा , भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष मंगेश झाडे भाजपा, माजी न. प.गटनेते राजीव जयस्वाल , धनगर समाज संघ अध्यक्ष नाचणगाव-पुलगाव सुधाकर गोरडे ,विजय ढगे, डॉ.रायपुरे,दीपक कावळे, प्रकाश साव,अमर तीनघसे, दिलीप भुजाडे, जुवारे , भास्कर वैद्य, सुनील उपासे, नितीन लांबाडे,प्रफुल ढोक, गजानन कडू (सरपंच-झाडगाव), राजेंद्र सतरे, गौतम उमरे, नीताताई ढगे, दीप्ती ढगे, निसार भाई, अनिल लेकुरवाळे , गौरव दांडेकर, राहुल काळे, मनोज वाल्दे, शंकर भानारकर, शकील भाई,संदीप बोरकुटे उपस्थित होते.भूमिपूजनानंतर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व मान्यवर मंचावर विराजमान झाले. धनगर समाज संघाच्या वतीने आ.डॉ. रामदास आंबटकर यांचे पुष्पहार घालून स्वागत झाल्यावर मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन सुधाकर गोरडे यांनी केले आणि विजय ढगे यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी पुलगाव, नाचणगाव, झाडगाव, शेंदरी येथील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी प्रसाद वितरण व चहापान नंतर कार्यक्रमाची यशस्वी सांगता संपन्न झाली.

# छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा





**वरोरा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.दिनकर गुरनुले यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले . तसेच प्रमुख मार्गदर्शक प्रा. विनोद कोरडे ,प्रा. दिपक खामनकर , प्रा. मनोज खंडाळकर यांनी विद्यार्थ्यांना डॉ आंबेडकर यांच्या जीवनावरील विविध पैलूंचा उजाळा दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचा विद्यार्थी ओम शेरकुरे तर आभार प्रदर्शन अनिकेत भगत यांनी केले. तसेच तुषार कडू , हर्षद ढवस व रमेश जीवतोडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# असह्य व्याजदरामुळे इंदिरा मार्केट आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केटचे व्यापारी त्रस्त

## आमदार रामदास आंबटकर यांना निवेदन



**पुलगाव । प्रतिनिधी**

विधानपरिषद सदस्य आ.रामदास आंबटकर यांचे दि.६ डिसेंबरला पुलगाव येथे आगमन होताच पुलगाव येथील व्यापारी बांधवांनी त्यांच्या समस्यांबाबत चर्चा केली.चर्चेदरम्यान नगर परिषद संकुलातील भाडेधारक असलेल्या दुकानदारांनी विधान परिषद सदस्य आ. रामदास आंबटकर यांची भेट घेतली. संकुलातील दुकानांवर असह्य दर लावले जात आहेत.मालमत्ता कर आणि त्यावर २४ टक्के व्याजाच्या चक्रवाढ दंडाबाबत निवेदन दिले. आमदार रामदास आंबटकर यांनी नगरविकास मंत्री यांची भेट घेऊन समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले.या प्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय गाते ,महाराष्ट्र भाजपा सदस्य राजीव बात्रा व भाजपा पुलगाव अध्यक्ष नितीन बडगे यांनी समस्या ऐकून घेतल्या. व्यापाऱ्यांना सहकार्याचे आश्वासन दिले.या व्यापारी मंडळीत राजकुमार पम्पलिया, सुनील नाहटा, जावेद भाई काझी, सलीमभाई, अनिल बत्रा, सुनील अरोरा, चंद्रप्रकाश तिवारी, वासुदेव रोहरा, घनश्याम खोरिया, प्रशांत कोचे, शंकर भानारकर, अब्दुल कलाम, अनिल माकडे, डॉ. ओमप्रकाश पंजवानी, मुस्ताक हुसेन जेठालाल आहुजा यांची प्रमुख उपस्थिती होती.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अखंड ज्ञानाचा सागर-डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अखंड ज्ञानाचा सागर असल्याचे वरोरा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वान दिना निमित्त डॉ. अंकुश आगलावे , श्री गुरूदेव प्रचारक यांनी सांगितले.डॉ. आगलावे पुढे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही जगण्यास एक नवा दृष्टीकोन व दिशा देते. आजच्या या महत्वाच्या दिवशी त्यांच्या विचारांचे जतन करून, त्याचा अवलंब करून व इतरापर्यंत पोहोचवणे हीच बाबासाहेंबाना खरी आंदरांजली आहे. .विश्वरत्न, अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडित, राजनीतिज्ञ, लेखक, समाज सुधारक, संविधानाचे जनक, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण



दिनानिमित्त आदरांजली वाहण्यात आली.यावेळी सुरेश महाजन, अहेतेशाम अली, बाबा भागडे, डॉ. सागर वझे , इंजि. रमेश राजुरकर, राऊत,अभय मडावी, शुभम चांभारे, वंदना दाते, विनोद लोहकरे,निंबाळकर,गुरूदेव सेवा मंडळचे प्रचारक, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा गडचिरोली दौरा पुढे ढकलला

## खा.अशोक नेते यांनी दिल्ली येथील कार्यालयातून दिली माहिती

**गडचिरोली । प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा येत्या ९ डिसेंबरचा गडचिरोली जिल्हा दौरा व प्रस्तावित कार्यक्रम तूर्त रद्द करण्यात आला आहे. शाह यांच्या दौऱ्याची पुढील तारीख मिळाल्यानंतर हे कार्यक्रम ठरविले जातील, अशी माहिती खासदार अशोक नेते यांनी दिल्ली येथील कार्यालयातून दिली.



जिल्ह्यातील विविध विकास कामांचे व प्रकल्पाचे भूमिपुजन, कोनसरी येथील लोहप्रकल्पाच्या पहिल्या टप्याचे उद्घाटन आणि दुसऱ्या टप्याचे भूमिपूजन, तसेच वडसा गडचिरोली रेल्वे लाईनच्या कामाचे भूमिपुजन, चिचडोह बॅरेजचे लोकार्पण अमित शाह यांच्या हस्ते होणार होते. परंतु काही महत्वपूर्ण कामांमुळे शाह यांना गडचिरोली दौरा पुढे ढकलावा लागल्याचे खा. नेते म्हणाले. यापूर्वी १८ नोव्हेंबरला शाह यांचा गडचिरोली दौरा होणार होता. परंतू तो निश्चित होण्याआधीच रद्द झाला होता. आता दुसऱ्यांदाच त्यांनी तारीख बदलविली आहे. पुढील तारीख लवकरच कळविण्यात येईल असे खा. नेते यांनी सांगितले आहे.

## संपादकीय

# भाजपचे 'उत्तर'




लोकसभा निवडणुकीची पूर्वपरीक्षा समजल्या जाणाऱ्या या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांना यंदा अपरिमित महत्त्व प्राप्त झाले होते आणि त्यास काही महिन्यांपूर्वी विरोधकांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या 'इंडिया' आघाडीची पार्श्वभूमी होती.आता तीन राज्यांत झालेल्या पराभवामुळे या आघाडीतील काँग्रेसची पत घसरणार आणि अन्य प्रादेशिक पक्ष 'इंडिया'वर वर्चस्व गाजवणार अशीच चिन्हे दिसत आहेत. भाजपच्या पारड्यात जनतेने टाकलेले हे यश जितके मोठे आहे; त्यापेक्षाही काँग्रेसचे अपयश अधिक दारूण आहे.भाजपच्या यशास अर्थातच या पक्षाची मजबूत संघटना आणि काळानुरूप याच पक्षसंघटनेत त्वरित बदल करण्याचे निर्णय कारणीभूत आहेत. मध्य प्रदेशात ज्योतिरादित्य शिंदे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे सत्ता गमवावी लागलेले माजी मुख्यमंत्री कमलनाथ आणि ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंग यावेळी हातात हात घालून प्रचारात उतरले होते.त्याचवेळी भाजपने मात्र 'मामाजीं'च्या मनाविरुद्ध काही केंद्रीय पातळीवरील नेते मैदानात उतरवले. अनेक विद्यमान आमदारांना घरी पाठवून नवे चेहरे दिले आणि त्याचवेळी केंद्र तसेच राज्याच्या लोककल्याणकारी योजनांचा डिंडिम पिटला.शिवाय, दस्तुरखुद्द मोदी यांनी अखेरच्या दिवसापर्यंत मैदान सोडले नाही. हे सारे भाजपला फलदायी ठरले आहे. मध्य प्रदेशात भाजपने काँग्रेसपेक्षा दुपटीहून अधिक जागा जिंकल्याने हा विजय किती मोठा आहे, तेच अधोरेखित झाले आहे. छत्तीसगडमध्ये तर भाजपने पराभवाच्या दाढेतून विजय खेचून आणला आहे.गेल्या निवडणुकीत तेथे काँग्रेसने ९० पैकी ६८ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला होता आणि बघेल हे या तुलनेने छोट्या राज्याचे मुख्यमंत्री असूनही त्यांची देशपातळीवर भक्कम प्रतिमा उभी राहिली होती. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यातही काँग्रेसच आघाडीवर होती आणि 'एग्झिट पोल'ही काँग्रेस राज्य राखणार हेच सांगत होते.मात्र, भाजपने छत्तीसगडमध्येही निवडणुकीच्या तोंडावर संघटनापातळीवर मोठे बदल केले. नवे प्रदेशाध्यक्ष नेमले. शिवाय, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही मध्य प्रदेशबरोबरच छत्तीसगडमध्येही निवडणूक व्यवस्थापनाच्या तळाच्या पातळीपर्यंत बारकाईने दिलेले लक्षच हे राज्य भाजपला विजयाच्या दिशेने घेऊन गेले आहे.या पार्श्वभूमीवर काँग्रेस गेल्या निवडणुकीत ही तिन्ही राज्ये जिंकल्यानंतरही जुनीच जोखडे गळ्यात बांधून फिरू पाहत होती. त्याचवेळी मध्य प्रदेशची धुरा ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे सोपवली असती तर काय होऊ शकले असते, ते आता आपल्या बालेकिल्ल्यातील अनेक जागा भाजपला मिळवून देत त्यांनी दाखवून दिले आहे.जी गत मध्य प्रदेशात झाली तीच राजस्थानातही काँग्रेसने ओढवून घेतली! त्या निवडणुकीच्या वेळी प्रदेशाध्यक्ष असलेले सचिन पायलट यांचा काँग्रेसच्या विजयात मोठा वाटा होता. मात्र, त्यांना मुख्यमंत्रीपद नाकारून ती माळ अशोक गेहलोत यांच्या गळ्यात घालण्यात आली. याचीच परिणती पायलट यांच्या बंडात झाली.ते बंड गेहलोत यांनी उधळून लावले खरे; पण त्यामुळेच त्यांना आपण पक्षापेक्षाही मोठे असल्याचे वाटू लागले. थेट काँग्रेस अध्यक्षपद नाकारून त्यांनी ते दाखवूनही दिले. अखेर या निवडणुकीत पायलट प्रचारापासून दूरच राहिले. या साऱ्याची परिणती अखेर राजस्थानात काँग्रेसची सत्ता भाजपने खेचून घेण्यात झाली आहे.अर्थात, पक्षांतर्गत मतभेद या डोकेदुखीला काँग्रेसबरोबरच भाजपलाही तोंड द्यावे लागलेच. राजस्थानात माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांना भाजपने प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात पूर्णपणे दूर ठेवले होते. मात्र, त्यांनी आपला इंगा दाखवताच, त्यांना त्यांच्या समर्थकांसह निवडणुकीत सामावून घेतले गेले.त्यापलीकडची बाब म्हणजे राजस्थानात काँग्रेसने कोणाशीच आघाडी न करण्याचा घेतलेला निर्णय. काँग्रेसने तेथे बहुजन समाज पक्ष आणि अन्य डाव्या पक्षांशी हात मिळवणी केली असती, तर काँग्रेसच्या किमान डझनभर जागा वाचल्या असत्या.हे अपयश अर्थातच 'इंडिया' आघाडीचे आहे. शिवाय, छत्तीसगडमध्ये 'आम आदमी पक्षा'ने उभे केलेले मतदार हे भाजपसाठी देवदूतच ठरले! त्यामुळेच आता लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपातही मतभेदांची दुराव्याची दरी मोठाच अडसर ठरू शकते.भाजपने जिंकलेल्या तिन्ही राज्यांत या पक्षाचा चेहरा मोदी हाच होता आणि त्यांनी आपल्या प्रत्येक सभेत अयोध्येतील रामाचे केलेले स्मरण तसेच अमित शहा यांनी मोफत अयोध्यावारीचे दाखवलेले आमिष यांचाही भाजपच्या यशातील वाटा नाकारता येणे कठीणच आहे.या अपयशातून सावरण्याचे मोठे काम आता काँग्रेसच्या शिरावर आले आहे; कारण भाजप आता लगोलग मोठ्या उत्साहाने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारास लागणार, यात शंकाच नाही. काँग्रेसला आता आपल्या घसरलेल्या पतीच्या पार्श्वभूमीवर या हिंदी भाषिक पट्ट्यात नव्या जोमाने उभे राहावे लागणार आहे आणि त्यासाठी 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांबरोबरच मोठ्या तडजोडीही कराव्या लागतील.मात्र, अवघ्या काही महिन्यांच्या अंतराने कर्नाटकापाठोपाठ तेलंगण हे दक्षिण भारतातील राज्य काँग्रेसने काबीज केल्यामुळे दक्षिण आणि उत्तर भारतीय मतदारांची मानसिकताही स्पष्ट झाली आहे. मात्र, त्यामुळे लोकसभा निवडणुकीस उत्तर विरुद्ध दक्षिण भारत असे स्वरूप येता कामा नये, ही काळजी सर्वच पक्षांना घ्यावी लागेल. आता कुतूहल भाजप या तीन राज्यांत नेतृत्व कोणाकडे सोपवते, एवढ्यापुरतेच उरले आहे.

# निर्विवाद आणि खणखणीत



पाच राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक झाली होती. त्यातला मिझोरामची मतमोजणी आज होत आहे. उरलेल्या चार राज्यांपैकी मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाने विरोधकांना आणि मुख्यत: काँग्रेसला चारी मुंड्या चीत केले आहे. लोकसभेची निवडणूक तोंडावर आलेली असताना हे यश पक्षाच्या दृष्टीने मोलाचे आहे. 'राजतिलक की करो तय्यारी..' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत लागोपाठ तिसऱ्यांदा म्हणता येईल, हा विश्वास भाजपच्या कार्यकर्त्यांच्या मनात जागविणारा हा विजय आहे. 'मोदी' हा ब्रँड अजूनही चालतो आहे, हे या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले.मध्यप्रदेशात शिवराजसिंह चौहान हे मावळते मुख्यमंत्री असूनही भाजपने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये तर काँग्रेसचीच सत्ता होती. तेथेही भाजपने संभाव्य मुख्यमंत्री म्हणून कुणाला पुढे केले नव्हते. तरीही तिथे मोठे यश मिळाले आहे. राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये 'अँटी-इन्कम्बन्सी' कामाला आली असे म्हणावे तर मध्यप्रदेशात इतके यश कसे काय मिळाले, असा प्रश्न पडू शकतो. शिवराजसिंह चौहान यांच्या शब्दांत तिथे 'प्रो-इन्कम्बन्सी' हाच घटक महत्त्वाचा ठरला आहे. तीनही राज्यांमध्ये विजयानंतर मोदींच्याच नावाचा गजर चालू असला तरी मध्यप्रदेशात शिवराजसिंह यांच्या कारभाराला आणि योजनांनाही या विजयाचे श्रेय द्यावे लागेल. 'मामाजी' शिवराजसिंह यांनी अर्जुनसिंह वगैरेंना मागे टाकून विक्रमी काळ मुख्यमंत्रिपद सांभाळले असून आताही त्यांना डावलून वेगळाच मुख्यमंत्री देणे मोदी व शहा यांना सोपे नाही. आपले नाव जाहीर न होताही त्यांनी धडाक्याने प्रचार केला आणि दोन तृतियांश बहुमत खेचून आणले. शिवाय, विजयानंतर मोदींना श्रेय द्यायला ते विसरले नाहीत. त्यांच्या गरीब महिलांच्या खात्यात दरमहा थेट रक्कम टाकण्याच्या आणि जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीच्या नावे सहा हजार रुपये गुंतविण्याच्या योजनेने जादू केली. काँग्रेस आणि कमलनाथ शिवराजसिंह यांच्या झंझावातासमोर टिकू शकले नाहीत. मात्र, मध्यप्रदेशात भाजपचे काही ज्येष्ठ नेते, मंत्री पराभूत झाले असून यातून सामान्य मतदारांचा विवेक दिसतो. भारतीय लोकशाहीचे हे लोभसवाणे वैशिष्ट्य आहे.उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांची राजकीय तोंडे वेगळ्याच दिशेला असण्याचा प्रवाह जुना असला, तरी त्यात मध्यंतरी खंड पडला होता. तो पुन्हा सुरू होताना दिसतो आहे. तेलंगण जिंकणाऱ्या काँग्रेसने या तिनातले एक राज्य जरी जिंकले असते, तरी ही दुफळी इतकी जाणवली नसती. लोकसभेच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला आता पुन्हा दक्षिण भारतावर लक्ष केंद्रित करावे लागेल. या तीनही राज्यांमधील पराभवामुळे 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीतील काँग्रेसचे स्थान काहीसे डळमळीत झाल्याशिवाय राहणार नाही. भावी पंतप्रधान म्हणून मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाची जी कुजबूज राजधानीत सुरू झाली आहे; तिच्याही मर्यादा या निकालांनी स्पष्ट केल्या आहेत. या निवडणुकांमध्ये 'ओबीसी कार्ड' खेळण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही, ही लक्षणीय बाब आहे. महाराष्ट्रातील पक्ष आणि नेत्यांनी यापासून योग्य तो धडा घ्यायला हवा. पंतप्रधान मोदी यांनी हा निकाल लागण्याआधी 'देशात तरुण, महिला, शेतकरी आणि गरीब या चारच जाती आहेत,' असे विधान केले आहे. ते महत्त्वाचे आहे. एका अर्थाने जातीपातींच्या पलीकडल्या हिंदुत्वाची परिभाषाच त्यांनी नव्या शब्दावलीत मांडली असून त्यात बिगरहिंदूंनाही समाविष्ट केले आहे. लोकसभेच्या प्रचारमोहिमेची दिशा सांगणारे हे विधान आहे. त्याला या निकालांनी नवा अर्थ दिला आहे.राजस्थानातला मतदार सगळ्या लाटा थोपवून आलटून पालटून राज्याची सत्ता सोपवतो आहे. हे या मतदारांचे अजब वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आता या विजयानंतर वसुंधरा राजे यांना बाजूला ठेवून कुणाला नेतृत्व द्यायचे, हा प्रश्न भाजपश्रेष्ठांना सोडवावा लागेल. तोही सोपा नाही. छत्तीसगडमध्ये भाजपला इतका मोठा विजय मिळेल, असे मतदानोत्तर कलचाचण्यांमध्ये स्पष्ट दिसले नव्हते. यावरून या चाचण्यांना असणारे केवळ मनोरंजन मूल्य लक्षात यावे. भाजप या विजयाचा उत्सव तर करेलच, पण पुढच्या तयारीला लागेल. अयोध्येतील राममंदिर भक्तांसाठी २३ जानेवारीला खुले होते आहे. विरोधकांना आता वेळ दवडून चालणार नाही. मध्यप्रदेशात अवघ्या काही जागा मागणाऱ्या अखिलेश यांचा काँग्रेस नेत्यांनी पाणउतारा केला होता. 'इंडिया' ही विरोधकांची आघाडी एकसंध राहून भाजपसमोर आव्हान उभे करायचे असेल, तर असे वागून चालणार नाही. उत्तर भारत आणि महाराष्ट्र या भूभागात काँग्रेस व इतर विरोधक आपली कामगिरी कशी उंचावतात, यावर लोकसभेच्या निकालांचे भवितव्य अवलंबून आहे. या निकालांनी इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्र भाजपलाही नवे बळ मिळाले असणार. तिरंगी आघाडीत भाजपचा शब्द आता अधिक ताकदीने चालेल. महाराष्ट्रात किंवा देशभरातच नरेंद्र मोदी यांना हरविण्यासाठी एकत्र आलेल्या विरोधकांना आता नवी, कल्पक रणनीती योजून ती अमलात आणावी लागेल. त्यासाठी आता हातात फार वेळ राहिलेला नाही. राज्यातल्या नेत्यांना ओलांडून आणि त्यांच्या डोक्यावरून मतदारांना साद घालण्याची ही खास इंदिरा गांधी यांची रणशैली होती. तीच मोदी अवलंबत आहेत. मात्र, यात प्रादेशिक क्षत्रपांचे पाय कापूनच टाकण्याची गरज नसते. मोदी यांच्या जवळचे काही प्रभावी नेते हे काम करत असतात. आपण परप्रकाशित आहोत, हे त्यांना कळले तर ते असे वागणार नाहीत. योगी आदित्यनाथ यांच्या पाठोपाठ आता शिवराजसिंह यांनी पक्षाच्या उतरंडीत आपले स्थान मजबूत केले आहे. काँग्रेसला किंवा 'आप'ला नावे ठेवताना आपला पक्षही एकचालकानुवर्ती होणार नाही; हे इतका मोठा विजय मिळाल्यावर भाजपने शिकायला हरकत नाही.

# आगामी महासंग्रामाची पटकथा



संसदेचे हिवाळी अधिवेशनच अखेरचे पूर्णवेळ चालणारे अधिवेशन ठरणार आहे. त्यात लोकसभेचे निवडणुकीचे मुद्दे निश्चित केले जाणार आहेत. काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालमध्ये भाषण करताना याचे पूर्वसंकेतही दिलेले आहेत.नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) व नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी (एनआरसी) हे दोन कायदे अस्तित्वात येणार असल्याचे म्हटले आहे. एकूणच सारी रणनीती २०२४च्या निवडणुकीवर डोळा ठेवून आखली जात आहे.'मोदी पर्व-२' च्या कार्यकाळातील संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आगामी लोकसभा निवडणुकीची पटकथेची बिजे रोवली जाणार आहेत. चार-पाच महिन्यांनी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीपूर्वी सुरू होणाऱ्या या हिवाळी अधिवेशनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.पाच राज्यांच्या जवळपास ६७८ विधानसभा मतदारसंघातील निकालाचे पडसाद निश्चितपणे आगामी लोकसभा निवडणुकांतील मुद्दे निश्चित करण्यासाठी कारणीभूत ठरणार आहेत. सत्तारुढ भाजपला पाच राज्यांच्या निवडणुकांच्या निकालापेक्षाही लोकसभा निवडणुकीची निरगाठ बांधणे आवश्यक आहे.याच हिवाळी अधिवेशनात पुढील लोकसभेचा निवडणुकीचा अजेंडा निश्चित होईल. विरोधकांनी अजेंडा निश्चित करण्याअगोदर सत्तारुढ पक्षाचे रणनीतिकार या अधिवेशनाच्या माध्यमातून आगामी लोकसभा निवडणुकीचा अजेंडा निश्चित करतील.त्यादृष्टीने मोदी सरकारने पावलेही टाकली आहेत. येत्या २२ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला राजकीयदृष्ट्या अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवडणुकीसाठी काय मुद्दे घेऊन लोकांसमोर जायचे, हे निश्चित आकलन झालेले आहे. कोणत्या पक्षांवर आक्रमण करायचे व कोणत्या पक्षांवर मेहेरबानी दाखवायची, याचेही गणित पक्के आहे.त्यामुळे या संसदेच्या अधिवेशनात विरोधकांचे जमलेले मेतकूट खरेच कायम राहणार काय, यावरही प्रश्नचिन्ह आहे. गेल्या एक सप्टेंबरला विरोधकांच्या २८ पक्षांच्या नेत्यांची बैठक झाल्यानंतर गेल्या तीन महिन्यांपासून या आघाडीमध्ये पूर्णपणे सामसूम आहे.काँग्रेसला पाच राज्यांच्या निवडणुकांच्या निकालाची ओढ आहे, तर इतर पक्षांच्या नेत्यांचा लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटपात जीव अडकलेला आहे. मोदी सरकारच्या विरोधात उभे राहिलेल्या 'इंडिया' आघाडीचा पाया अद्यापही भुसभुशीत असल्याची जाणीव भाजपच्या नेत्यांना आहे.यामुळे तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) खासदार महुआ मोईत्रा यांच्या निलंबनाचा विषय लोकसभेत चर्चेला आल्यास किती विरोधक एकत्र राहतात हे पाहावे लागेल. त्यातूनच विरोधकांची 'लिटमस टेस्ट' होणार आहे. लोकसभेच्या शिस्तपालन समितीने खासदार महुआ मोईत्रा यांना निलंबित करण्याची शिफारस केलेली आहे.या शिफारशीवर लोकसभेच्या बहुमताची मोहोर उमटणे आवश्यक आहे. या मुद्यावर विरोधक अद्यापही एकत्र आलेले दिसत नाहीत. एवढेच नव्हे तर खुद्द 'टीएमसी'चे खासदारही फारसे मोईत्रांच्या बाजूने उभे असल्याचे चित्र नाही. विरोधकांच्या एकजुटीच्या धोरणामध्ये असलेल्या या भेगा भाजपचे चाणक्य चांगलेच जाणून आहेत. भाजपचा वार या भेगांवर राहणार असल्याचे या अधिवेशनातून दिसून येणार आहे.या हिवाळी अधिवेशनानंतर पुढील महिन्यात संसदेचे अर्थसंकल्पी अधिवेशन होणार आहे हे खरे. परंतु या अर्थसंकल्पी अधिवेशनाला राजकीयदृष्ट्या फारसे महत्त्व राहणार नाही. चार महिन्यांसाठी लेखानुदान संमत करून घेणे हाच महत्त्वाचा विषय या अधिवेशनात राहणार आहे.सन २०२४-२५ या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या जुलै महिन्यात नवे सरकार मांडणार आहे. हे हिवाळी अधिवेशनच अखेरचे पूर्णवेळ चालणारे अधिवेशन ठरणार आहे. याच अधिवेशनात लोकसभेचे निवडणुकीचे मुद्दे निश्चित केले जाणार आहेत.काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालमध्ये भाषण करताना याचे पूर्वसंकेतही दिलेले आहेत. नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) व नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी (एनआरसी) हे दोन कायदे अस्तित्वात येणार असल्याचे म्हटले आहे.'सीएए'ला संसदेने काही वर्षांपूर्वीच मंजुरी दिली आहे. परंतु या कायद्याचे नियम अद्यापही केंद्र सरकारने केलेले नसल्याने हा कायदा लागू झालेला नाही. हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण करण्यासाठी 'सीएए' व 'एनआरसी' हे दोन्ही कायदे महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.या नियमांना केंद्र सरकारने मंजुरी दिल्यास विरोधकांकडून विरोध होण्याची शक्यता आहे. यासोबतच जम्मू व काश्मीरबाबत चार विधेयके केंद्र सरकार याच अधिवेशनात मंजूर करून घेण्याची शक्यता आहे.जम्मू व काश्मीरच्या विधेयकांचा देशातील इतर भागातील लोकांशी फारसा संबंध येत नसला तरी जम्मू व काश्मीर हा मुद्दाच भारतीय जनमानसाला नेहमीच प्रभावित करीत आला आहे. यातून ध्रुवीकरणाची ज्योत पेटविली जाऊ शकते, याची जाणीव भाजपच्या नेत्यांना निश्चितपणे आहे.जम्मू व काश्मीर आरक्षण कायद्यानुसार जम्मू व काश्मीरमधून स्थलांतरित झालेल्या हिंदू पंडितांना विधानसभेत दोन जागा आरक्षित करण्याचे एक विधेयक आहे. याशिवाय 'जम्मू व काश्मीर पुनर्रचना दुरुस्ती विधेयक' व अनुसूचित जाती व जमातींच्या संदर्भात दोन विधेयकेही या अधिवेशनात येण्याची शक्यता आहे. ही चारही विधेयके संसदेत मांडण्यात आली आहेत. परंतु त्यावर चर्चा झाली नाही.याशिवाय भारतीय राष्ट्रवादाची फोडणी या अधिवेशनात देण्याची पूर्ण तयारी मोदी सरकारने केलेली आहे. नव्या तीन भारतीय फौजदारी विधेयकांना मंजुरी दिली जाण्याची शक्यता आहे. भारतीय न्याय संहिता,भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय साक्ष विधेयक , ही तीनही विधेयके गेल्या ११ ऑगस्टला पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी लोकसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मांडली. परंतु त्यावर चर्चा झाली नाही. गेल्या सप्टेंबर महिन्यात झालेल्या विशेष अधिवेशनातही या विधेयकावर चर्चा झाली नाही.या अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यात या तिन्ही विधेयकांवर चर्चा करून त्यांना कायद्याचे स्वरुप देण्याचा प्रयत्न होणार आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्ती व भारतीय राष्ट्रवाद या विधेयकांतून लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या तिन्ही कायद्यातील त्रुटींवर विरोधक काही आक्षेप घेतीलही;परंतु गेल्या दीडशे वर्षांपासून देशात अस्तित्वात असलेल्या व इंग्रजांनी तयार केलेल्या फौजदारी कायद्याला भारतीय परिमाण देण्याचा मोदी सरकारचा प्रयत्न निश्चितपणे भारतीयांना भावणारा असणार आहे. हा मुद्दा आगामी लोकसभा निवडणुकीत प्रचाराचा एक प्रमुख मुद्दा राहणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच सरकारसोबतचे विरोधक व सरकारच्या विरोधातील राजकीय पक्ष अशी सरळसरळ विभागणी केली. जे सरकारच्या बरोबर आहेत, त्यांना कोणताही त्रास द्यायचा नाही.सरकारच्या विरोधात आवाज उठविणाऱ्या पक्षाच्या नेत्यांना ईडी व सीबीआयच्या माध्यमातून नामोहरम करण्याची चाल खेळली जात आहे. यात काँग्रेस, टीएमसी, शिवसेना (ठाकरे गट), आप, द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या नेत्यांवर केंद्रीय तपास यंत्रणांकडून वारंवार कारवाई होत आहे.त्याचवेळी समाजवादी पक्ष, बसपा, बिजद, , राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट), एमआयएम, अण्णा द्रमुक, राष्ट्रीय लोकदल या विरोधी पक्षाच्या नेत्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. देशात २०० लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजप व काँग्रेस अशी थेट लढत होत असते.यात टीएमसी, आप, द्रमुक, नॅशनल कॉन्फरन्स या पक्षांची भर टाकली तरी जवळपास सव्वातीनशे जागांवर भाजपला थेट लढाई करावी लागणार आहे. सपा, बसपा, रालोद, बिजद वायएसआर काँग्रेस, अण्णाद्रमुकच्या या पक्षांचा विचार करता त्यांच्या प्रभावाखालील पावणेदोनशे जागांवर भाजपला सामना करावा लागणार आहे.बिहार व महाराष्ट्रात बिघडलेल्या राजकीय समीकरणांमुळे भाजपला बहुमतासाठी जागा कमी पडल्यास विरोधकांच्या मदतीची गरज पडू शकते. एकाचवेळी सर्व विरोधकांना दुखावणे हे मोदी सरकारसाठी शक्य व व्यवहार्य नाही.त्यामुळेच या हिवाळी अधिवेशनात विरोधकांची एकी होणार नाही, याची काळजी मोदी सरकारतर्फे घेतली जाणार आहे. यासाठी मोदी सरकारतर्फे काय पावले उचलली जातील, हे मोदी सरकारच्या या हिवाळी अधिवेशनातील रणनीतीतून स्पष्ट होणार आहे. यातच आगामी लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची पटकथाही लिहिली जाणार आहे.

# नारी शक्ती सक्षम होणे आवश्यक-डॉ.मनिषा कोठेकर

**पुलगाव । प्रतिनिधी**

वेद, पुराण काळात व इतिहासात सुद्धा महिलांना महत्वपुर्ण स्थान होते. ब्रम्हवादिनी, यज्ञकर्ता, योद्धा, शासक अशा विविध भुमिकेत त्या होत्या.जगामध्ये याचे आकर्षण होते. सद्यस्थितीत देशाच्या सर्वच क्षेत्रात महिला अग्रेसर ठरत आहे.त्यामुळे नारी शक्तीने सक्षम होणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन भारतीय स्त्री शक्तीच्या राष्ट्रीय संघटनमंत्री डॉ. मनिषा उपेंद्र कोठेकर यांनी केले.महिला समन्वय च्या वतीने आयोजित नारीशक्ती संमेलनात उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. मुडे लॉन वर्धा येथे जिल्हास्तरीय नारीशक्ती संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाला जिल्ह्यातून मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्मिता पावडे, समाजसेविका मनिषा मेघे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांनी दीप प्रज्वलन करून संमेलनाचे उद्घाटन केले. प्रास्ताविक अर्चना वानखेडे यांनी केले तर अपर्णा हरदास, प्रज्ञा देशमुख व पल्लवी वखरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.वैयक्तिक गीत वर्षा बल्लाळ यांनी गायिले. या सत्रात डॉ. स्मिता पावडे यांनी महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याविषयी माहिती दिली. महिलांनी संसार आणि मुलं सांभाळताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. घरातील स्त्री सशक्त राहिली तर कुटुंब आनंदी राहील. कुटुंब आनंदी राहिले तर समाजाला काही देऊ शकेल, असे सांगितले. मनिषा मेघे यांनी सोशल फोरम च्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये महिलांना देत असलेल्या रोजगार व इतर सोयी सुविधा बद्दल माहिती दिली.या सत्राचे सुत्रसंचालन पल्लवी वखरे यांनी केले. न्यू इंग्लिश अकॅडमी अँड जीनियस यांनी अन्न वाचवाया विषयावर पथनाट्य सादर केले. मासोद येथील आदिवासी मुलींनी गोंडी नृत्य सादर केले. द्वितीय सत्रामध्ये वर्ध्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांचे विचार व त्यावरील प्रश्नांना उत्तरे असा चर्चात्मक कार्यक्रम झाला. यावेळी डॉक्टर जैन यांनी स्त्रियांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी. पिझ्झा, बर्गर, मॅगी तसेच फास्ट फूडचे मुलांवरील परिणाम यावर चर्चा केली. महिलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. त्याचप्रमाणे अँड विभा देशमुख यांनी महिला आपल्या हक्कासाठी कायद्याचा आधार घेण्यासाठी पुढे येत नाही. त्यांच्या घरचा पुरुषच पुढे येतो. महिला आपली तक्रार समाजापुढे मांडण्यास अद्यापही घाबरते. दूरदर्शनवरील मालिकांमध्ये सासा सुनांची भांडणे घरात होणारे तणाव व याचा मुलांवर होणारा परिणाम, यामुळे मुले कुटुंबापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कुटुंबातून ज्या वयात संस्कार व्हायला हवे, ते होत नाही. सुनिता ढवळे यांनी समाजातील स्त्रियांच्या समस्या सोडवताना अनेक अडचणी येतात, याची अनेक उदाहरणे दिली. साधना उमाळकर यांनी शिक्षणाचा खरा उद्देश काय? की ज्ञानासाठी? मुलांना शिक्षण देताना पालकाची काय भूमिका असते आणि मुलींच्या बाबत त्यांची भूमिका कशी असते? यावर प्रकाश टाकला. वैशाली येरावार यांनी राजकारणात स्त्रिया स्वतःहून येत नाहीत त्या सामाजिक कार्य करू शकतात, परंतु राजकारणात येताना त्यांना पुरुषांच्या आधाराची गरज लागते. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद यामधील आरक्षणामुळे महिला मोठ्या प्रमाणावर राजकारणात येत आहे. जनतेचे प्रश्न सोडवण्यास त्या पुढाकार घेत आहे. यावेळी लाठीकाठीचे साहसिक प्रात्यक्षिक पण दाखविण्यात आले.तृतीय सत्रामध्ये वरोरा येथील लोकमान्य महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.जयश्री शास्त्री यांनी मातृत्व, कर्तृत्व व नेतृत्व या तीन गुणांच्या माध्यमातून नारी शक्तीने कसे व्यक्तिमत्व घडवावे, हे अनेक उदाहरण देऊन बिंबवले.समुद्रापूरच्या विद्या विकास महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. नयना तुळसकर नारी शक्तीने शिक्षण घेणे किती आवश्यक आहे, हे सांगितले. या सत्राचे सुत्रसंचालन प्रज्ञा देशमुख यांनी केले.या सत्रात वैयक्तिक गीत सर्वदा जोशी हिने गायले,संपुर्ण कार्यक्रमाचे संचालन मंजिरी राजपायले यांनी तर आभार प्रदर्शन पल्लवी वखरे यांनी केले.कार्यक्रमांची सांगता केतकी कुळकर्णी यांच्या वंदेमातरम गायनाने झाली.




# कृषी महाविद्यालयाने दिले मृदा संवर्धनाचे धडे

## जागतिक मृदा दिना निमित्त आयोजित उपक्रम

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती वरोरा द्वारा संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा च्या वतीने दिनांक ५ डिसेंबर या जागतिक मृदा दिनानिमित्त महाविद्यालयात विदयार्थ्यां करिता मृदा हाच जीवनाचा आधार या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालय व एफएमसी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमानाने तालुक्यातील कोसरसार येथे जागतिक मृदा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुहास पोद्दार , सुशील वाघ सहाय्यक प्राध्यापक मृद विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग तसेच एफएमसी कंपनीचे टेरिटरी मॅनेजर गोरे आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.




कार्यक्रमात डॉ. सुहास पोद्दार यांनी माती परीक्षणाचे महत्त्व , सेंद्रिय खतांचा योग्य वापर, रासायनिक खतांचा संतुलित वापर , जमिनीची निगा कशी राखावी याबद्दल सखोल मार्गदर्शन केले तसेच माती परीक्षणाबद्दल सुशील वाघ यांनी तर गोरे यांनी जमिनीचे आरोग्य या बाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमा मध्ये स्थानिक शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर माती नमुना गोळा करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले . या कार्यक्रमाला लबान सराड फार्मर प्रोडूसर कंपनी चे पदाधिकारी, सभासद तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# अभाविप ब्रम्हपुरीचे अभ्यास वर्ग मुल येथे संपन्न



**मुल । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद देशातील नव्हे तर जगातील सर्वात मोठे विद्यार्थी संघटन आहे. अभाविप ब्रह्मपुरी जिल्हा तर्फे दि. १ व २ डिसेंबर ला योगा भवन क्रीडा संकुल, मूल येथे दोन दिवसीय अभ्यास वर्ग आयोजित करण्यात आला होता. या दोन दिवसीय अभ्यास वर्गाचे उद्घाटन प्रा. डॉ. खुशाल राठोड यांच्या द्वारे करण्यात आले, यामधे अभाविप परिचय, सैद्धांतिक भूमिका, अभाविप कार्यपद्धती, कार्यकर्ता व्यवहार, महिला सशक्तीकरण, आचार पद्धत्ती, महाविद्यालयीन कामकाज, प्रवास व संपर्क विविध विषयांवर चर्चा झाली.

या अभ्यास वर्गात ६ स्थानावरून १० महाविद्यालयातून, २० विद्यार्थी, ६१ विद्यार्थी व ८ प्राध्यापक अशे एकूण ८९ विद्यार्थी उपस्थित होते. यामधे संदेश उरकुडे याची जिल्हा संयोजक तर प्राध्यापक अतुल कांबळी यांची जिल्हा प्रमुख व तळोधी - नागभिड भाग संयोजक जया महाडोळे, मूल-सावली भाग संयोजक लोचन तलमले सिंदेवाही - नवरगाव भाग संयोजक म्हणून भूमिका गेडाम यांनी घोषणा करण्यात आली. यावेळी विदर्भ प्रांत मंत्री शक्ती केराम , प्रांत सहमंत्री पायल किणाके, विभाग संयोजक वैदेही मुडपल्लिवर, प्रा.शशिकांत शेंडे व नगरातील किशोर कापगते,प्रवीण मोहूर्ले, व इतर नगरवासी उपस्थित होते.

# लखन केशवानी ठरले मृत्युंजय दूत

**वरोरा । प्रतिनिधी**

पोलीस विभागाला महत्त्वाच्या वेळी सहकार्य करणे, अपघात समयी सुवर्ण तासात महामार्गावरील अपघातग्रस्तांना तातडीने मदत उपलब्ध करून देणे याबद्दल दिला जाणारा प्रतिष्ठेचा मृत्युंजय दूत पुरस्कार लखन केशवानी यांना नुकताच प्रदान करण्यात आलावरोरा शहराच्या सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असलेले प्रसंगी निराधारांवर अंत्यसंस्कार करणारे, २४ तास सेवा ग्रुपचे अध्यक्ष लखन केशवानी यांना पोलीस अधीक्षक (महामार्ग), प्रादेशिक विभाग नागपूर त्यांनी हा पुरस्कार देऊन सन्मानित केले. चंद्रपूर- नागपूर महामार्गावर अनेक अपघात होतात. अपघातातील जखमींना तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे, रुग्णालयात भरती करणे, वैद्यकीय सेवा पुरविणे आणि पोलिसांना सहकार्य करणे याकरिता केशवानी यांना हा पुरस्कार पोलीस अधीक्षक (महामार्ग ) यशवंत सोळंके, पोलीस निरीक्षक खैरकर, पोलीस उपनिरीक्षक उमाकांत गौरकार यांच्या हस्ते सदर पुरस्कार देण्यात आला. केशवानी यांचे विविध सामाजिक संघटना, प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी आदिनी अभिनंदन केले आहे.




# वर्धा नागरी बँकेला तीन जिल्ह्यात शाखांची परवानगी

**पुलगाव** - वर्धा जिल्ह्यातील अग्रगण्य नागरी सहकारी बँक वर्धा नागरी सहकारी अधिकोष (बँक )मर्यादित, वर्धाला रिजर्व बँकेने अमरावती, नागपूर व येथे शाखा सुरु करण्याची परवानगी दिली आहे.दि.६ डिसेंबर ला रिजर्व बँकेकडून वर्धा नागरी बँकेला याबाबत पत्र प्राप्त झाले आहे. बँकेला प्रथमच जिल्ह्याच्या बाहेर शाखा उघडण्याची परवानगी मिळाली आहे. विशेषतः ही परवानगी तीन वेगवेगळ्या जिल्ह्यात मिळाली असून जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी मिळाली आहे. यातील दोन शाखा महसूल केंद्रास्थानी आहे. नविन शाखा प्राप्त झाल्याबद्दल बँकेचे अध्यक्ष केशवराव दांडेकर, उपाध्यक्ष रजयकुमार डहाके, मुख्य कार्यकारी अधिकारी कांचन केळकर, सर्व संचालक मंडळाचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# जनता विद्यालय ताडाळी येथे संविधान दिन व क्रांतीसुर्य महात्मा फुले यांना अभिवादन



**ताडाळी:**-जनता विद्यालय ताडाळी येथे संविधान दिन व क्रांतीसुर्य महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले . या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ शिक्षिका अनिता बुच्चे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी मन्नत सिंग व वैष्णवी निकुरे यांनी भाषणे व माहिती सांगितली. कार्यक्रमाला शाळेचे विद्यार्थी- विद्यार्थिनी, विना भगत , सुधा उमरे , प्रणव उलमाले, विठ्ठल जुनघरे, किशोर बांबोडे उपस्थित होते.आभार प्रदर्शन उमरे यांनी केले.

# कोनसरी परिसरातल्या सहा गावांतील जागा औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित

## ८९८. ८४ हेक्टर जागेच्या भूसंपादनाला मान्यता



**मुधोली चकच्या गावकऱ्यांचा विरोध**

दरम्यान मुधोली चक क्र.२ येथील नागरिकांनी ग्रामसभा घेऊन प्रकल्पाला जमीन देण्यास विरोध दर्शवला. प्रकल्पात आमची कसदार जमीन गेल्याने शेती करणे कठीण होईल, आमच्या पूर्वजांच्या आठवणी असलेली घरे जातील अशी शंका व्यक्त करत नागरिकांनी जमीन हस्तांतरण करण्यास विरोध दर्शविला आहे.

**गडचिरोली । प्रतिनिधी**

औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी चामोर्शी तालुक्यातील कोनसरी परिसरात असलेल्या सहा गावांमधील ८९८.८४२२ हे.आर. खासगी जागेचे भूसंपादन करून तो परिसर औद्योगिक क्षेत्र म्हणून राखिव राहणार आहे. त्यात कोनसरी, मुधोली चक १, मुधोली चक २, जयरामपूर, सोमनपली आणि पारडी देव या सहा गावांचा समावेश आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम १९६१ अन्वये तेथील जागेचे भूसंपादन करण्याची कारवाई करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या चामोर्शी औद्योगिक क्षेत्राकरिता लॉयड्स मेटल्स अॅन्ड एनर्जी लिमिटेड यांना ५०.२९ हेक्टर आर क्षेत्राचा भूखंड क्र ए-१ वाटप केला होता. त्यावर आता उद्योगाची उभारणी झाली आहे. या प्लान्टच्या विस्ताराकरिता त्या भूखंडाला लागून असलेले अतिरिक्त क्षेत्र पास थ्रू पद्धतीने संपादन करण्याची आवश्यकता होती. त्या अनुषंगाने सहा गावांमधील खासगी जागेचे भूसंपादन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयाबद्दल डॉ. देवराव होळी यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहे.

जिल्ह्यात लॉयड्स मेटल्सच्या कोसनरी येथील लोहप्रकल्पानंतर इतरही मोठे उद्योग येण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील हजारो युवकांना नोकरीच्या मोठ्या संधी प्राप्त होतील, असा दावा केला जात आहे.

# ग्रेस च्या वतीने महापरिनिर्वान दिना निमित्त डॉ.बाबासाहेबांना अभिवादन

**गडचिरौली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्हा अनुसूचित जाती कॉंग्रेस विभागाच्या वतीने जिल्हा कॉंग्रेस कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वान दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी गडचिरोली जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी महासचिव डॉ. नामदेव किरसान, माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, कॉंग्रेसचे जेष्ठ नेते हसनअली गिलानी, समशेरखान पठाण, जि. प. माजी उपाध्यक्ष मनोहर पा. पोरेटी, शहर अध्यक्ष सतीश विधाते, युवक कॉंग्रेस प्रदेश सचिव विश्व्जीत कोवासे, अनुसूचित जाती सेल अध्यक्ष रजनीकांत मोटघरे, सहकार सेल अध्यक्ष अब्दुलभाई पंजवाणी, रोजगार सेल अध्यक्ष दामदेव मंडलवार, ग्राहक सेल अध्यक्ष भारत येरमे, रमेश चौधरी, हरबाजी मोरे, पांडुरंग घोटेकर, काशिनाथ भडके, अनिल कोठारे, जलेंद्र खोब्रागडे, रामदास टिपले, वसंत बाबनवाडे, संजय गावडे, सुदर्शन उंदीरवाडे, ढिवरू मेश्राम, प्रफुल आंबोरकर, अरुण भादेकर, अभिषेक चौधरी, दत्तात्रय करंगामी, नेताजी गुरनुले, सूरज धोडरे, उत्तम ठाकरे, आशाताई मेश्राम, पौर्णिमाताई भडके, वंदनाताई ढोक, वर्षाताई गुलदेवकर, सुनिताताई रायपुरे गिताताई वाळके सह कॉंग्रेस पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.





बुधवारी मूल तालुक्यात पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, माझ्या फिस्कुटी गावातील (झाडीच्या)प्रदेशातील धानाची डिबली जशी नव्या नव्या नवरीसारखी खुलून दिसत आहे, धान बांधनीची लागबग संध्या मंदावली आहे. (रोहित कामडे मूल)

# जैवविविधता वाचविण्यासाठी लढणारे फॉरेस्ट रेंजर्स खऱ्या अर्थाने समाजातील हिरो

## आशिया स्तरावरील पहिल्या रेंजर्स फोरममध्ये वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे गुवाहाटीत प्रतिपादन

**गुवाहाटी (आसाम) । प्रतिनिधी**

पर्यावरण आणि वन्यजीव रक्षणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणाऱ्या वनक्षेत्रपालांमुळे जैवविविधता सुरक्षित असून धनापेक्षा जीवन सुरक्षित करणारे वन श्रेष्ठ आहे हे पटवून सांगण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळे यासाठी झटणारे फॉरेस्ट रेंजर्स हे खऱ्या अर्थाने हिरो आहेत असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी काढले. गुवाहाटी येथे आयोजित पहिल्या आशियाई रेंजर्स फोरमच्या उदघाटन समारंभात ते बोलत होते. आशिया खंडातील विविध देशांसह, भारताच्या विविध राज्यातील रेंजर्स या तीन दिवसीय फोरमसाठी उपस्थित झाले होते. यावेळी मंचावर आसामचे वने व पर्यावरण मंत्री चंद्रमोहन पटवारी, आसामचे वनबल प्रमुख एम. के. यादव, एशियन रेंजर्स फोरमचे अध्यक्ष रोहित सिंग, आशिया चे अध्यक्ष ख्रिस ग्लोरिस, वन्यजीव विभागाचे प्रधान मुख्य वन संरक्षक संदीप कुमार उपस्थित होते. यावेळी ना मुनगंटीवार म्हणाले, जगण्यासाठी श्वास अर्थात प्राणवायू देणाऱ्या जंगलांच्या वाढीची जबाबदारी सर्वांनी मिळून घ्यायला हवी.




भारतातील सर्वाधिक वाघ महाराष्ट्रात असून, वनक्षेत्रातदेखील मोठी वाढ गेल्या काही वर्षांत झाली आहे. चंद्रपूरच्या ताडोबा व्याघ्र प्रकल्पाकडे जागतिक पर्यटकांचा ओढा असतो असे सांगून ना मुनगंटीवार म्हणाले, जैवविविधता नष्ट होणार नाही यासाठी व्यापक प्रयत्न झाले पाहिजे. ते म्हणाले, महाराष्ट्रात अर्थ व वनमंत्री होतो. पर्यावरणाप्रती आपण काही तरी देणं लागतो या भावनेतून अर्थमंत्री पदाच्या कार्यकाळात वन विभागाचे बजेट वाढविले ,आजच्या घडीला देशातील वन विभागाला सर्वाधिक बजेट महाराष्ट्रात मिळत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख ना. मुनगंटीवार यांनी केला. यावेळी विशेष कामगिरी करणाऱ्या महिला रेंजर्सना ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. महाराष्ट्राच्या वन विभागातही महिला कार्यरत असून त्यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. ५० कोटी वृक्षालागवड , हॅलो फॉरेस्ट अशा प्रकल्पांच्या माध्यमातून आपण सातत्याने महाराष्ट्रातील वनसंवर्धनासाठी प्रयत्न करीत असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले. गुजरातच्या हिना पटेल, मेघालयाच्या मर्थिलिना संगमा, राजस्थानच्या प्रेमकुंवर सत्तावर, महाराष्ट्राच्या दीपिका वशिष्ठ यांना एक्सप्लोरिंग वुमनहुड फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या वनदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा दीपाली देवकर उपस्थित होत्या. महाराष्ट्रात मानव-वन्यजीव संघर्षात दिला जाणारा मोबदला आजच्या घडीला देशातील सर्वाधिक आहे. अगदी पुरातन काळापासून भारतात वन आणि वन्यजीव व्यवस्थापन केले जात आहे. आधुनिक भारतातील रेंजर्स हे व्यवस्थापन करणाऱ्यांपैकी एक आहेत. सिमेवर सैन्याचे जवान देशाच्या संरक्षणासाठी लढा देतात. तर सिमेच्या आत वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी पर्यावरण रक्षणासाठी लढा देतात, असे ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. देशाच्या कानाकोपऱ्यात आता 'वन की बात' होणे गरजेचे आहे. ही गरज ओळखत आपण महाराष्ट्राचे वनमंत्री या नात्याने काम करीत आहोत. इतरांनीही यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमी देशाच्या कल्याणाचा आणि प्रगतीचा विचार केला–प्रा.रणजित मेश्राम

## गोंडवाना विद्यापीठात व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न

**गडचिरोली । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतावर अपार प्रेम होते. 'माझ्या देशावर प्रेम करण्यापासून मला कोणीही रोखू शकत नाही'असे ते म्हणायचे. डॉ. आंबेडकरांनी परदेशी विद्यापीठांतून शिक्षण घेतले असले तरी त्यांचे सर्व अभ्यासाचे आणि प्रबंधाचे विषय भारताशी संबंधित होते. त्यांनी भारताच्या परिस्थितीचा अत्यंत सखोल आणि शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास केला.या देशाची स्पंदने त्यांनी खऱ्या अर्थाने समजून घेतली. त्यांनी नेहमी देशाच्या कल्याणाचा आणि प्रगतीचा विचार केला. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत आणि नागपूरचे ज्येष्ठ पत्रकार प्रा.रणजीत मेश्राम यांनी केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त गोंडवाना विद्यापीठात आज व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे होते .प्र-कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण , डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप बारसागडे, आदी उपस्थित होते.स्वातंत्र्य पूर्व काळाविषयी बोलताना ते म्हणाले,डॉ.आंबेडकरांची दूरदृष्टी होती.फक्त स्वातंत्र्य हेच सर्वस्व नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर




देशाचा कारभार कसा चालेल, याचाही विचार करणे आवश्यकआहे. असे मत प्रा.मेश्राम यांनी व्यक्त केले.डॉ.आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी त्यांच्याकडे निष्पक्षपाती आणि खुल्या मनाने पाहण्याची गरज आहे, असे प्रा.मेश्राम यांनी आवर्जून सांगितले. अध्यक्षस्थानावरुन बोलतांना गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे म्हणाले, गोंडवाना विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राव्दारे बाबासाहेबांचे विचार समाजापर्यंत पोहचवण्याचे काम सुरू आहे. अशा विचारांचे संकलन करण्याचा निर्णय डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राने घेतला आहे. माझी चमू अशाच प्रकारे हिरिरीने काम करेल अशी अशा मी व्यक्त करतो . तसेच या महामानवाविषयी माझी संप्रेरणा व्यक्त करतो असे ते याप्रसंगी म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप बारसागडे, संचालन मराठीचे स. प्रा. डॉ. नीळकंठ नरवाडे,आभार कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी मानले. या कार्यक्रमाला बाळासाहेब घरडे, वरिष्ठ पत्रकार रोहितदास राऊत, पत्रकार जयंत निमगडे, कवियत्री कुसुम आलाम तसेच शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते.या कार्यक्रमाचा लाभ विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या समनव्यक डॉ. प्रीती काळे तसेच इतर सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# माफसु येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन




**नागपूर । प्रतिनिधी**

०६ डिसेंबर रोजी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती तैलचित्राला व संचालनालय विस्तार शिक्षण येथील प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी संचालक संशोधन तथा कुलसचिव डॉ नितीन कुरकुरे, संचालक विस्तार शिक्षण तथा अधिष्ठाता (निम्नशिक्षण) डॉ अनिल भिकाने, अधिष्ठाता (मत्स्य) डॉ सचिन बोन्डे, नियंत्रक (वित्त व लेखा) मनीषा शेंडे, विद्यापीठ अभियंता प्रतिभा वानखेडे, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ आरजू सोमकुंवर, विद्यापीठ ग्रंथपाल सुनील गावंडे, परीक्षा नियंत्रक डॉ भूषण रामटेके, उपकुलसचिव (आस्था) डॉ अजय गावंडे, उपकुलसचिव (शिक्षण) डॉ जितेंद्र वाघाये, कुलगुरू महोदयांचे खासगी सचिव डॉ वकार खान, कुलगुरू महोदयांचे तांत्रिक अधिकारी डॉ अतुल ढोक, तांत्रिक अधिकारी डॉ संजय गोडबोले, डॉ गिरीधर शेंडे, तांत्रिक अधिकारी व अध्यक्ष, कास्टट्राईब माफसु कर्मचारी संघटना डॉ प्रज्ञेय ताकसांडे, डॉ गीतांजली ढुमे, सहाय्यक नियंत्रक (वित्त) रामराव कीर्तने, संचालक विस्तार शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक व उपाध्यक्ष, कास्टट्राईब माफसु कर्मचारी संघटना प्रवीण बागडे तसेच मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सरस्वती नर्सिंग स्कुल, गुंजखेडा सामाजिक समरसता दिन साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक आई सरस्वती बहुउद्देशिय महिला विकास संस्था द्वारा संचालित सरस्वती नर्सिंग स्कुल, रुख्माबाई ठोंबरे कॉलेज ऑफ फार्मसी, श्रीरामकृष्ण नेत्र महाविद्यालय, तसेच प्रा. रामभाऊ ठोंबरे विज्ञान, कला व वाणिज्य ज्यु कॉलेज, गुंजखेडा (पुलगांव) यांच्या संयुक्त विद्यमानाने सामाजिक समरसता दिन साजरा करण्यात आला. सर्व प्रथम द्विप प्रज्वलित करुन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय जीवनावर प्रकाश टाकुन त्यांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन करण्यात आले.



यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. रामभाऊ ठोंबरे, प्रा. धनराज शंभरकर , कवी दातार तसेच डॉ. मिलिंद ठोंबरे, . संजय घांगळे, स्वराज ग्रुपचे अध्यक्ष सचिन खटोले तसेच संस्थाध्यक्ष भारती मिलिंद ठोंबरे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी गीत सादर केले. तसेच कॉलेजचे प्राध्यापिका प्रतिक्षा शेंडे, प्रतिक्षा नरांजे, प्रिया पेटकर, तृप्ती डुकरे, रश्मी बावनकर, कांचन राऊत, कल्याणी गांडोळे, प्रा.जगदीशसिंह सोनाग्रे, उज्वल बम तसेच कर्मचारी श्रीकांत बिरे, बंटी जयदे, प्रदीप बावने, नंदकिशोर चव्हाण, संदीप पांडे उपस्थित होते.

# संत संताजी जगनाडे महाराज जयंती निमित्य पालखी शोभायात्रा

**मूल । प्रतिनिधी**

विदर्भ तेली समाज महासंघ मूल द्वारा तेली समाजाचे आराध्य दैवत संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या ३९९ वी जयंतीचे औचित्य साधून ८ डिसेंबर रोजी भव्य पालखी शोभायात्राचे,आयोजन करण्यात आले आहे.




सकाळी ११ वाजता तेली मोहल्ला ते मा.सा.कन्नमवार सभागृह चंद्रपूर रोड अशी भव्य पालखी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. त्यानंतर जयंती सोहळा, आरती,मान्यवरांचे मार्गदर्शन, सामाजिक, शैक्षणिक, उद्योगशील क्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्या तेली समाज बंधू भगीनीचे सत्कार,समाज प्रबोधन, इयत्ता १० वी,१२ वी,पदवी,पदव्युतर विभागात सत्र २०२३ मधील गुणवंत विदयार्थी, नवनिर्वाचित लोक प्रतिनिधिंचे सत्कार,गितगायन,अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाचे प्रेरणास्थान बबनराव फ़ंड चंद्रपूर, रघुनाथ शेंडे सिंदेवाही, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सूर्यकांत खनके अध्यक्ष वि.ते.स.महा.चंद्रपूर, कारेक्रमाचे उपाध्यक्ष देवराव भांडेकर माजी आमदार विधानसभा. सत्कारमुर्ती रामदास आंबटकर सदस्य विधान परिषद, डाँ. शेषराव कावळे उपकुलगुरू गोंडवाना विद्यापीठ, मल्लिकार्जून इंगळे उपविभागीय पोलीस अधीकारी, प्रमुख अतिथी मान. प्रकाश देवातळे सामाजिक कार्यकर्ता, धनराज मुंगले जिल्हा उपाध्यक्ष वि.ते.स.महा चंद्रपूर, मीनाक्षी गुजरकर महिला जिल्हाध्यक्ष वि.ते.स.चंद्रपूर डाँ.प्रभूदास चिलबुले जिल्हा उपाध्यक्ष वि.ते.स. महा.चंद्रपूर, आरोग्य मार्गदर्शक डाँ. प्रफुल आंबटकर अस्थीरोगतज्ञ् चंद्रपूर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाला तालुक्यातील समस्त तेली समाज बंधू - भगिनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कैलास चलाख जिल्हा संघटक विदर्भ तेली समाज महासंध चंद्रपूर च्या वतीने करण्यात आले आहे.

# चंद्रपूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा व्याघ्र सफारी प्रकल्प करणार

## पर्यटनाला चालना देण्यासाठी पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांचा महत्वाकांक्षी संकल्प

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विदर्भ ही वाघांची भूमी आहे; जैवविविधतेने संपन्न असलेल्या या भूमीत देश विदेशातील पर्यटक दरवर्षी मोठ्या संख्येने येतात; याच पार्श्वभूमीवर चंद्रपूर येथे जागतिक दर्जाची व्याघ्र सफारी प्रकल्प करण्याचा संकल्प असून यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांची मदत देखील घेता येईल; यामुळे पर्यटनाला चालना मिळेल आणि परिसरात रोजगार निर्मिती व अर्थकारण मजबूत होण्यास निश्चित मदत होईल यासाठी वन अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावे अश्या सूचना राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या. नागपूर येथे यासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.या बैठकीला प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, वनबलप्रमुख शैलेंद्र टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता, वनविकास महामंडळाचे सिजिएम संजीवकुमार, प्रशांत झुरमुरे, कल्याणकुमार यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी एक सादरीकरण ना. सुधीर मुनगंटीवार यांना दाखविण्यात आले.चंद्रपूर-मूल मार्गावर वनप्रबोधिनी जवळील प्रशस्त वनक्षेत्रात व्याघ्र सफारी प्रकल्प व्हावा असा संकल्प असून केवळ व्याघ्र सफारीपुरता हा मर्यादित न ठेवता इतर वन्यजीवांचाही या सफारीत समावेश व्हावा यासाठी प्रयत्न व्हावा;अश्या प्रकल्पातून संशोधन व्हावे अशीदेखील अपेक्षा यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. ना. मुनगंटीवार म्हणाले कि, सर्व वयोगटातील पर्यटकांना आकर्षित करणारे नवीनतम, अत्याधुनिक दर्जाचे विरंगुळा केंद्र या ठिकाणी व्हावे यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक असून तेथे असलेल्या वन्यजीवांची माहीती, त्यावर एखादा माहितीपूर्ण शो पर्यटकांसाठी करता येईल का, याचाही विचार करावा अशा सूचना यावेळी दिल्या.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .